करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...
साप्ताहिक कमलाभवानी
# संदेश
वर्षे 34 वे
www.saptahiksandesh.com

संस्थापक संपादक
डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक
सौ.उषादेवी बाबूराव हिरडे
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०

रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३४ वे | अंक क्र.२७ | पाने-१२ | दि.१९/७/२०२४ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ४ रू.

आपल्या व्यवसायाची ऑनलाईन जाहिरात करण्यासाठी उपयुक्त ठिकाण
साप्ताहिक संदेश ऑनलाईन न्यूज पोर्टल
संपर्क 9822058106
www.saptahiksandesh.com




# रिटेवाडी उपसासिंचन योजनेसाठी कमालीचे प्रयत्न
## विधानसभा निवडणुकीपूर्वी होणार महत्वाची घोषणा

करमाळा : रिटेवाडी उपसासिंचन योजना कार्यान्वीत करण्यासाठी तालुक्यातील सर्वच लोकप्रतिनिधींनी जोर लावला असून, विधानसभेला दगाफटका होवू नये म्हणून या योजनेसाठी विशेष तरतूद केली जाणार असल्याचे खात्रीलायक समजते. दरम्यान रिटेवाडी उपसासिंचन योजना संघर्ष समितीचे राजकर्त्यांना बाजुला ठेवून योजना मंजुरीसाठी कमालीचे प्रयत्न सुरु आहेत.

करमाळा तालुक्यातील ४० ते ५० गावांना रिटेवाडी उपसासिंचन योजनेचा फायदा होणार आहे. ही योजना कार्यान्वीत करण्यासाठी तालुक्यातील जवळपास ५० गावातील सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामस्थ हे संघटीत झाले असून त्यांनी रिटेवाडी उपसासिंचन योजना संघर्ष समिती स्थापन केली असून यासाठी अधिकारी व पदाधिकारी यांच्याशी वारंवार संपर्क केला जात आहे. याबाबत अधिक्षक अभियंता पासून ते थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पर्यंत या संघर्ष समितीचा संपर्क चालू आहे. याबाबत माजी आमदार नारायण पाटील यांनीही सातत्याने वरीष्ठ पातळीवर संपर्क ठेवून पाठपुरावा केला आहे. (पान २)

कुकडी प्रकल्पातील करमाळा तालुक्याच्या हक्काचे ५.५ टीएमसी पाणी राखीव आहे. हे पाणी २५० किमी वरून कॅनॉलद्वारे आणले जाते. परंतु ते पुरेशा प्रमाणात मिळत नाही. रस्त्यातच हे पाणी जिरवले जाते. त्यामुळे कुकडीचे पाणी हे उजनीत सोडून रिटेवाडी येथून ५.५० टीएमसी पाणी थेट उचलून विहाळच्या तलावात सोडलेतर कॅनॉलच्या माध्यमातून परिसरातील ४० गावे, खाली मांगी तलावात ते पाणी जावू शकते. कॅनॉल प्रणाली उपलब्ध असल्याने केवळ ५०० कोटी रूपयात ही योजना पूर्ण होऊ शकते व तालुक्याचे दरवर्षी ५ हजार कोटीचे उत्पन्न वाढू शकते. त्यामुळे रिटेवाडी योजना पूर्णत्वास येण्याबाबत सर्वचजण अनुकूल आहेत.



राजकरणात केवळ सत्ता हेच धोरण ठेवून चालत नाही, तर सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी त्यांच्यात मिसळावे लागते.

संपादकीय.......................................!

# विधानसभा उडते रंग !

युध्दात, प्रेमात आणि राजकारणात सर्व माफ असते असे म्हणतात. पण त्याचा अतिरेक नसावा असाही सल्ला दिला आहे. पण अलीकडे हा सल्ला धुडकावून अनेक राजकरणी धडाधड पक्ष बदल करत आहेत. राज्यात पक्षांतराचा धडाका दिसत आहे. लोकसभा निवडणुकीपुर्वी करमाळा तालुक्यातील माजी आमदार नारायण पाटील यांनी शरद पवार राष्ट्रवादी मध्ये तर व बागल गटाच्या नेत्या रश्मी बागल यांनी भाजपामध्ये प्रवेश केला आहे. लोकसभा निवडणुकीनंतर माजी आमदार जयवंतराव जगताप यांचा भाजपाबरोबर असलेला संपर्क कमी होवून कॉंग्रेस बरोबर संपर्क वाढला आहे.

माजी आमदार नारायण आबा पाटील यांची सुरूवात राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या स्थापनेबरोबर झाली. सन १९९९ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीसाठी माजी आमदार पाटील हे राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून उभे होते. त्यावेळी त्यांना अवघी १२५०७ मते मिळाली. त्यानंतर त्यांनी सन २००४ साली विश्रांती घेतली आणि माजी आमदार जयवंतराव जगताप यांचे समर्थन करून त्यांना निवडून आणण्यात महत्वाची कामगिरी बजावली. त्यावेळी जगताप शिवसेनेकडून उभे होते म्हणजे पाटील यांनी शिवसेनेचा प्रचार केला. त्यानंतर सन २००९ च्या निवडणुकीत आमदार पाटील हे चक्क विनय कोरे यांच्या जनसुराज्य पक्षाकडून उभे राहिले त्यावेळी त्यांनी दुसऱ्या क्रमांकाची मते म्हणजे ४३१२६ मते मिळवली. त्यानंतर झालेल्या सन २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत माजी आमदार पाटील यांनी शिवसेनेत प्रवेश केला. त्यानंतर झालेल्या विधानसभेला शिवसेनेची उमेदवारीही त्यांना मिळाली. यावेळी त्यांना ६०६७४ मते मिळाली, त्यावेळी ते २५७ मतांनी विजयी झाले होते. सन २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत पाटील यांना दुसऱ्या क्रमांकाची ७३३२८ मते मिळाली.

करमाळ्याचे माजी आमदार,जगताप गटाचे नेते जयवंतराव जगताप यांची सुरुवात अपक्ष उमेदवार म्हणून झाली. त्यांनी सन १९९० ची विधानसभा निवडणूक लढवली व ते विजयी झाले होते. त्यावेळी त्यांना ३५७६२ मते मिळाली तर त्यांचे प्रतिस्पर्धी माजी आमदार कै.रावसाहेब पाटील यांना २०६७० मते मिळाली होती. त्यापुर्वी जगताप गट हा कॉंग्रेसचा अविभाज्य घटक होता, पण या निवडणूकीपासून जगताप गट व कॉंग्रेस यांच्यात फारकत झाली. सन १९९५ च्या विधानसभा निवडणूकीवेळी जगताप हे पुन्हा कॉंग्रेसकडून उभे राहिले . त्यावेळी जगताप यांना दुसऱ्या क्रमांकाची ४१४८५ मते मिळाली. पुढे सन १९९९ च्या निवडणूकीपुर्वी कॉंग्रेसचे दोन गट पडले. कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस. त्यावेळी जगताप हे राष्ट्रवादी कॉंग्रेस बरोबर होते. ऐनवेळी राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांनी राष्ट्रवादीची उमेदवारी नारायण पाटील यांना दिली. त्यावेळी जगताप यांनी ऐनवेळी पुन्हा कॉंग्रेसकडे आपला मोर्चा वळवला व कॉंग्रेसची उमेदवारी मिळवली. त्यावेळीही त्यांना दुसऱ्या क्रमांकाची म्हणजे ४३१०६ मते मिळाली. त्यानंतर सन २००४ च्या निवडणूकीत कॉंग्रेस-राष्ट्रवादीची युती झाली, त्याची उमेदवारी कै.दिगंबरराव बागल यांना जाहीर झाली. त्यामुळे जगताप यांनी यु टर्न घेत थेट मुंबईला जावून मातोश्री गाठले आणि अन्य उमेदवाराची उमेदवारी कापून स्वत:साठी शिवसेनेची उमेदवारी मिळवली. विशेष म्हणजे ते शिवसेनेच्या तिकिटावर २००४ मध्ये ६२६९२ मते मिळवून निवडून आले. त्यानंतर सन २००९ च्या झालेल्या विधानसभा निवडणूकीवेळी जगताप हे फारसे प्रचलित नसलेल्या समाजवादी पार्टीकडून उभे राहिले. त्यावेळी त्यांना २५४९१ मते मिळाली व ते थेट तिसऱ्या स्थानवर फेकले गेले. त्यानंतर सन २०१४ च्या निवडणुकीत ते पुन्हा एकदा कॉंग्रेसकडून उभे राहिले. त्यावेळी ते चक्क चौथ्या स्थानावर पोहोचले . त्यांना फक्त १४३४९ मते मिळाली. सन २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला. त्यांनी अपक्ष उमेदवार संजयमामा शिंदे यांना पाठींबा दिला, त्याचा फायदा शिंदे यांना झाला, ते ५४९२ मतांनी विजयी झाले.

बागल गटाच्या नेत्या रश्मी बागल यांची राजकिय वाटचाल अलीकडील असली तरी बागल गटाचे संस्थापक कै.दिगंबरराव बागल यांची राजकीय वाटचाल शेकापमधून सुरू झाली. त्यानंतर सन १९९५ ची निवडणुक ते अपक्ष लढले व जिंकले, त्यावेळी त्यांना ४५४२३ मते मिळाली होती. पुढे सन १९९९ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत ते भाजपा-सेनेकडून पुरस्कृत अपक्ष म्हणून उभे राहिले. त्यावेळी ते अवघ्या ६८१ मतांनी विजयी झाले. त्यांना ४३७८७ मते मिळाली. पुढे सन २००४ साली कै. बागल हे राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून उभे राहिले. त्यावेळी त्यांना दुसऱ्या क्रमांकाची मते म्हणजे ५९०५२ मते मिळाली. पुढे कै.बागल हे कॉंग्रेसमध्ये गेले होते पण माजी मंत्री दिगंबरराव बागल यांच्या निधनानंतर बागल गटाने राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये प्रवेश घेतला. सन २००९ साली श्रीमती शामलताई बागल या राष्ट्रवादीतून लढल्या व त्या विजयी झाल्या, त्यांना त्यावेळी ७०९४३ मते मिळाली.पुढे सन २०१४ च्या निवडणुकीत बागलगटाकडून रश्मी बागल उभ्या होत्या. त्यांचा पोस्टल मतातील मते बाद केल्याने अवघा २५७ मतांनी पराभव झाला. त्यांना ६०४१७ मते मिळाली. सन २०१९ च्या विधानसभेसाठी त्यांनी चक्क शिवसेनेत प्रवेश केला पण त्यांना आदिनाथची सत्ता भोवली. त्या थेट तिसऱ्या स्थानावर गेल्या त्यांना ५३२९५ मते मिळाली.

चौथे स्पर्धक संजयमामा शिंदे यांची वाटचाल म्हणजे शिंदे परिवार अगोदर कॉंग्रेस,नंतर राष्ट्रवादी कॉंग्रेस. सन २०१४ च्या विधानसभेसाठी ते स्वाभिमानी पक्षाकडून उभे होते. त्यावेळी ते तिसऱ्या स्थानावर गेले होते. त्यांना ५८३७७ मते मिळाली होती. त्यानंतर त्यांचा संपर्क भाजपाबरोबर होता. भाजपाच्या सहकार्यानेच ते जिल्हापरिषदेत अध्यक्ष झाले. त्यानंतर सन २०१९ ला लोकसभा निवडणुकीला ते थेट राष्ट्रवादीकडून उभे राहिले पण पराभूत झाले. त्यानंतर लगेच सन २०१९ च्या झालेल्या विधानसभेला ते अपक्ष उमेदवार म्हणून उभे राहिले. ७८८२२ मते मिळाली व ते विजयी झाले.

तसं पाहिलेतर करमाळा विधानसभा मतदारसंघ हा पुर्वी अपक्ष उमेदवारांना साथ देणारा मतदार संघ आहे तरीही अलीकडे येथे पक्षीय राजकारण सुरु झाले आहे. असे असलेतरी येथील नेतेमंडळी सतत अस्थिर आहेत. तत्वनिष्ठा गुंडाळून सत्ता मिळवण्यासाठी कोठेही जाणारी ही मंडळी आहेत. विचार-आचार-संस्कार-संस्कृती या बाबी या नेतेमंडळींनी गुंडाळून ठेवल्यात की काय..? असे विचारण्याची वेळ आली आहे. हे वरीष्ठ पातळीवरील नेत्यांचे झाले पण दुसऱ्या व तिसऱ्या फळीतील कार्यकर्तेही सतत गट बदलात ही बाब सुध्दा तशी लक्षणीय आहे. मतदार कसाही गोल केला जावु शकतो; हा या मंडळीचा समज आहे. तो त्यांचा गैरसमज आहे. हा गैरसमज लोकसभा निवडणुकीत बऱ्यापैकी दुर झाला आहे. आगामी विधानसभेला हीच नेते मंडळी वेगवेगळे चिन्ह घेऊन आपल्या समोर येणार हे नक्की. येथील मतदारही हुशार आहे. नेमके काय ते लवकरच समजेल.

पान १ वरून पुढे...

## रिटेवाडी उपसासिंचन योजनेसाठी कमालीचे प्रयत्न

तर भाजपाच्या महिला आघाडीच्या राज्य उपाध्यक्षा रश्मी बागल यांनी भाजपामध्ये प्रवेश करतानाच रिटेवाडी योजनेची मागणी केलेली आहे. त्यानुसार राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जलसंपदा अधिक्षक अभियंता यांना या योजनेच्या सर्व्हेसाठी निधीचे अंदाजपत्रक सादर करण्याचे आदेश दिले आहेत. विद्यमान आमदार संजयमामा शिंदे यांनी कुकडी उजनी उपसासिंचन योजनेच्या सर्वेक्षण निधी संदर्भात राज्याचे उपमुख्यमंत्र्यांनी निर्देश दिल्याचे जाहीर केले आहे. रिटेवाडी उपसासिंचन योजनेला शासनाने हिरवा कंदिल दिला नाहीतर आगामी विधानसभा निवडणुकीवर निम्मा तालुका बहिष्कार घालण्याच्या तयारीत आहे. ही बाब समजल्याने शासनाच्या जोरदार हालचाली सुरू आहेत.

प्लॉट विकणे आहे
पुणे रोडवरील आत मधील एन.ए. असलेला
दीड गुंठा कॉर्नर प्लॉट योग्य किंमतीत विकणे आहे.
● संपर्क : मो.९४२३२३७६८५

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

## शंभुराजे जगताप यांच्या संकल्पनेतून भव्य दिंडी सोहळा

# दिंडीतून पर्याव



करमाळा(सं.प्र.) : जगताप गटाचे युवा नेते, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक शंभुराजे जगताप यांच्या संकल्पनेतून महात्मा गांधी विद्यालयातील विद्यार्थ्यांचा दिंडी सोहळा उत्साही वातावरणात संपन्न झाला. या दिंडीद्वारे केशर आंब्याच्या वृक्षाचे शहरवासियांना वाटप करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. ह.भ.प.साबळे महाराज व शंभुराजे जगताप यांच्या शुभहस्ते म.गांधी विद्यालयाच्या प्रांगणात पालखी पूजन करून दिंडीस प्रारंभ झाला.

या दिंडी सोहळ्यात शंभुराजे जगताप यांचेसह साबळे महाराज, प्राचार्य बी.के.पाटील, उपप्राचार्य अनिस बागवान, पर्यवेक्षक रमेश भोसले, पर्यवेक्षिका सुनिता नवले तसेच शहरातील प्रतिष्ठीत नागरीक तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक-शिक्षिका, कर्मचारी व सर्व विद्यार्थी सहभागी झाले होते. दिंडीमध्ये रिंगण सोहळ्यातील महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडवणारे छत्रपती शिवाजी महाराज, माता जिजाऊ, सावित्रीबाई फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर इ. महापुरूषांच्या व संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत जनाबाई, संत बाळुमामा, मर्यादा पुरूषोत्तम श्रीराम, सीतामाई, पवनपुत्र हनुमान आदी वेशभुषात विद्यार्थी-विद्यार्थीनी सहभागी होते. अश्वारूढ रिंगण सोहळा हे दिंडीचे खास आकर्षण ठरले. पताकाधारी वारकरी, पोतराज, वासुदेव, बहुरूपीच्या वेशभुषेत विद्यार्थी, टाळमृदंग, पखवाज, विणेकरी, डोक्यावर टोपी अन् फेटा, काष्टा घातलेल्या महिला वारकरी विद्यार्थीनी, टाळांचा आवाज अन् मुखी हरिनाम, डिजे वरील अभंग, गौळणी, भक्तीगीते, लेझीम नृत्य, फुगडी इ. बाबींनी विठूरायाला साकडे घातले

विघ्नहर्ता इंटिरीयर
प्रोप्रा : अभिषेक कमलेश देवी
मो.9028075051
करमाळा शहरातील एकमेव 'लॅमिनेट आणि हार्डवेअर' चे भव्य शोरूम
देवी प्लायवुड ॲन्ड हार्डवेअर
● प्लायवुड ● किचनट्रॉली ● वॉलपेपर
● हार्डवेअर ● फेव्हिकॉल ● वुडन फ्लोरिंग ● सनमायका
प्रोप्रा : अभिनव कमलेश देवी 9011524252
पत्ता : मेनरोड, जैन मंदिर जवळ, करमाळा., जि.सोलापूर

## कुंभारगाव येथे माध्यमिक व प्राथमिक शाळेचा एकत्रित दिंडी सोहळा

करमाळा(सं.प्र.) : कुंभारगाव येथे शरदचंद्र पवार माध्यमिक विद्यालय, जि.प.शाळा, जि.प.शाळा माळीवस्ती यांचे वतीने संयुक्तरित्या बालदिंडी काढण्यात आली. या दिंडीत सर्व विद्यार्थी व शिक्षक वारकरी संप्रदायाचा पोशाख परिधान करून सहभागी झाले होते. जि.प.शाळेपासून राम मंदिर, राधाकृष्ण मंदिर मार्गे संपूर्ण गावामधून दिंडी काढण्यात आली. मुलांच्या हातात टाळ, भगवे ध्वज व मुखातून सुरु असलेला ज्ञानोबा माऊली तुकाराम चा जयघोष याने संपूर्ण वातावरण विठ्ठलमय झाले होते. मुलांमध्ये एक विठ्ठल, रूक्मीणी, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, संत मुक्ताई, जनाबाई तयार करून कपाळी चंदन अष्टगंध बुका लावून टाळ मृदं भगवे



पताका, डोक्यावर तुळस व वेगवेगळ्या वृक्ष दिंडीचे संदेश घेऊन बालचमुचा हा दिंडी साहळा एक नवी स्फूर्ती देणारा वाटत होता. शरदचंद्र पवार विद्यालयाचे मुख्याध्यापक नानासाहेब आढाव यांचे मार्गदर्शनाखाली हा दिंडी सोहळा पार पडला.

## गुरूकुल पब्लिक स्कुलची बालदिंडी - दिंडीतून वैकुंठगमन देखावा



करमाळा(सं.प्र.) : आषाढी एकादशी निमित्त गुरूकुल पब्लिक स्कुलमध्ये बालदिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या दिंडीत नर्सरी ते पाचवीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. पालखी पूजन, प्रतिमा पूजन व विठ्ठल-रूक्मीणी आरती घेऊन दिंडीची सुरूवात करण्यात आली. या दिंडी सोहळ्यात विद्यार्थी व पालकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला तो तुकाराम महाराज वैकुंठगमन देखावा. या देखाव्यामध्ये प्रत्यक्ष तुकाराम महाराज गरूडावर बसून विठ्ठलाच्या भेटीला जात असल्याचा देखावा सादर करण्यात आला. महाराष्ट्रातील दोन वीर ज्यांनी समाजाला सामाजिक एकतेचा व परिवर्तनाचा संदेश दिला ते म्हणजेच संत तुकाराम महाराज व छत्रपती शिवाजी महाराज. दिंडी कार्यक्रमात गुरू-शिष्य भेटीचा प्रसंगही सादर करण्यात आला. तसेच वृक्षतोड करू नका झाडे लावा हा संदेश देत झाडे लावा-झाडे जगवा हे नाटकही सादर केले. भक्तीपर गीतावर टाळ गजर सादर केला. इतर कलाकारांनी अभंग, गौळण, भरूडे गायली. दिंडी सोहळा संस्थेचे संस्थापक नितीन भोगे व सचिव सौ.भोगे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

प्रियंका आय केअर हॉस्पीटल
पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600
उपलब्ध सुविधा... डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र
● मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
● जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
● फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
● सुसज्ज ऑपरेशन थिएटर ● नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
● लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
● एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमेट्री
डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
अत्याधुनिक प्रकारची लेझार सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
आदिका मेडिकल, पुणे रोड, करमाळा., जि.सोलापूर

डिस्काउंटच्या जमान्यामध्ये भव्य डिस्काउंटसह
फ्रेश मटेरियलची हमी फक्त एव्हरफ्रेश सुपरमार्ट मध्येच !
खालील सर्व ब्रॅन्डेड वस्तूंच्या MRP वर कमीत कमी
10% पासून 51% पर्यंत डिस्काउंट
अंबारी, सुहाना, प्रविण, रामबंधू, नवजीवन हिंग, किसान, काटदरे, चिंग्ज, कुकवेल, सवई मसाले,
पारले, ब्रिटानिया, सनफिस्ट, हलदीराम चितळे, अमुल, लक्ष्मीनारायण, दावत कल्याण भेळ, सफोला,
कोलगेट, पतंजली, पेप्सोडेंट, मेस्वाक, बबुल, विको, मॅक्सफ्रेश, मेडिमिक्स, संतुर, डव्ह, मोती, लिरील
टाटा, सोसायटी, विक्रम, रेड लेबल, सह्याद्री, परिवार, नेस व ब्रु कॉफी, लिपटन ग्रीन टी व ड्रायफ्रुटस्
पॉण्डस पावडर, पॅराशुट, एचयुल, गुडनाईट, हिमालया, डाबर, गोदरेज, सर्व टूथपेस्ट व टूथब्रश
डेटॉल, हारपीक, लॉयजॉल, निरमा, रिन, टाईड, एरियल, व्हील, पितांबरी, विम, लक्स, लाईफबॉय
इंदुलेखा, सेसा, केशकिंग, नवरत्न, लॉरिअल पॅरिस, जस्मीन, व्हॅसलीन, निविया, फॉग, यार्डली, केएस
गाला, मिल्टन, ओरल बी, हगीज व सर्व बेबी प्रोडक्टस्, बेकरी, स्वीटस् व नमकीन, पुजा साहित्य इ.
टीप : डिस्काउंट ऑफर, नियम व अटी समजावून घेण्यासाठी एव्हरफ्रेश सुपरमार्टला भेट द्या !
॥ नावाप्रमाणेच सर्व काही फ्रेश ॥
एव्हरफ्रेश सुपरमार्ट
॥ प्रिमियम क्वॉलिटी ॥ ॥ भरघोस डिस्काउंट ॥
*नियम व अटी लागू
किराणा । मसाले । प्रिमियम ड्रायफ्रुटस् । बिस्कीटस् । नमकीन अँन्ड स्वीटस् । बेकरी अँन्ड मिल्क प्रॉडक्टस् । । नॅचरल प्रॉडक्टस् । पर्सनल, होम अँन्ड बेबी केअर । आयुर्वेदिक वस्तु । पुजेचे साहित्य
पंढरपूर अर्बन बँके समोर, दत्तपेठ, करमाळा. मो.7059293031

## यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात
# नव्याने प्रवेश घेतलेल्या अकरावीच्या विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत



करमाळा (सं.प्र.) : विद्या विकास मंडळ संचलित यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ वर्षामधील अकरावी कला, वाणिज्य व विज्ञान वर्गातील विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव विलासराव घुमरे, अध्यक्ष प्राचार्य मिलींद फंड यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार महाविद्यालयातील बारावीच्या विद्यार्थ्यांनी टाळ्या वाजवून स्वागत केले. तर प्राचार्य डॉ.एल.बी. पाटील, सहसचिव विक्रमसिंह सुर्यवंशी, कनिष्ठविभागाचे उपप्राचार्य संभाजी किर्दाक आदी मान्यवरांनी गुलाबपुष्प देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले. यावेळी प्राचार्य पाटील यांनी विद्यार्थ्यांना आत्तापासूनच आपले ध्येय निश्चित करून अभ्यास करावा; असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.एम.डी.जाधव यांनी केले तर आभार प्रा.डी.एन. कुंभार यांनी मानले.

# बालाजीनगर येथे संस्कृती प्री-प्रायमरी स्कुलचे उद्घाटन





करमाळा(सं.प्र.) : स्काय फाउंडेशन अंतर्गत संस्कृती प्री-प्रायमरी स्कुल उद्घाटन स्त्रीरोग तज्ञ डॉ.कविता कांबळे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून डॉ.कविता कांबळे यांच्या मातोश्री व माजी शिक्षणाधिकारी शारदा लोंढे उपस्थित होत्या. यावेळी डॉ.कांबळे यांनी मार्गदर्शन केले. संस्कृती प्री-प्रायमरी स्कुलच्या सर्वेसर्वा सुमन बडेकर यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले. सुत्रसंचालन विजयश्री गायकवाड यांनी केले तर उपस्थितांचे आभार तेजश्री ओतारी यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अनुपमा सांगडे, पाटील मॅडम यांनी विशेष योगदान दिले. यावेळी नवीन लहान विद्यार्थी व त्यांचे पालक उपस्थित होते.

संस्कृती प्री-प्रायमरी स्कुलचा १६ जुलैला लहान विद्यार्थी-विद्यार्थीनींनी मिळून दिंडी सोहळा पार पडला. सोहळ्यात सर्व पाल्य, बाल वारकरी वेशभुषेत सहभागी झाले. बालाजीनगर, सिंचननगर मध्ये दिंडी काढण्यात आली. जय जय रामकृष्ण हरी.. च्या जयघोषात सर्व परिसर दुमदूमुन गेला होता. सुमन बडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा दिंडी सोहळा संपन्न झाला.

प्रवेश देणे सुरू | स्काय फाउंडेशन अंतर्गत | प्रवेश देणे सुरू
संस्कृती प्री-प्रायमरी स्कुल
कृष्णाजीनगर, करमाळा., जि.सोलापूर
• नर्सरी • एल.के.जी. • यु.के.जी.
वयोमर्यादा :- 3 ते 6 वर्ष वेळ :- 10.00 ते 2.00
" लहान मुलांच्या सर्वांगीण विकासाकरीता विश्वासार्हत "
सौ.सुमन बडेकर (9175254151)
सौ.विजयश्री गायकवाड (7499149173)
सौ.तेजश्री ओतारी (7875385353)

करमाळा शहरात प्रथम सुरू..!
Reg no.42433
पाटील
डॉ.सौ.अर्चना दिनेश पाटील
( Clinical Cosmetologist & Trichologist )
स्किन, हेअर अ‍ॅन्ड जनरल क्लिनिक
उपलब्ध सुविधा
• त्वचा : P.R.P. चिकित्सा, I.P.R.F. चिकित्सा, P.R.P. मायक्रोनीडलिंग, अ‍ॅटी येजिंग थेरपी, मुरुम व मुरूमाचे डाग घालवणे, वांग व व्रण घालवणे, चेहऱ्यावरील सुरकुत्या घालवणे, ब्रायडल फेशियल, मेडी फेशियल, हायड्राफेशियल, स्किन पोलिशिंग, चामखीळ काढणे, मस काढणे, पर्मनंट आयब्रो, पर्मनंट लिप कलर
• केस : P.R.P.चिकित्सा, I.P.R.F.चिकित्सा, I.J.F.C.थेरपी, टक्कल पडणे, केस गळणे, केसातील कोंडा घालवणे, केसांची वाढ खुंटणे, केस पांढरे होणे, चाई पडणे
• सर्व आजारांवर उपचार • रक्त लघवी तपासणी • लहान मुलांना वाफ देणे
• सांधेदुखी, कंबरदुखी • होमिओपॅथिक उपचार
पत्ता : संगोबा रोड, श्रीदेवीचामाळ, करमाळा. मो.9604801573

## प्रत्येक एस.टी.आगारात दर सोमवारी व शुक्रवारी
# प्रवाशांच्या तक्रारीचे निराकरण करण्यासाठी 'प्रवासी राजा दिन' उपक्रम

करमाळा(सं.प्र.) : प्रवाशांच्या तक्रारी, समस्या, बसस्थानकातील शौचालय स्वच्छ आणि इतर सूचनांचे तात्काळ निराकरण करण्यासाठी एस.टी. प्रशासनाकडून वेगवेगळ्या उपाययोजना करण्यात येत आहेत. त्यातील एक महत्वाकांक्षी उपक्रम म्हणजे प्रवासी राजा दिन हा असून हा उपक्रम प्रत्येक आगारात दर सोमवारी आणि शुक्रवारी राबवला जाणार आहे.

या उपक्रमाद्वारे प्रत्येक समस्या ही आगारातच सुटणार आहे. त्यामुळे आता बसची खिडकी तुटली तरी जवळच्या आगारात तक्रार करता येणार आहे. त्यामध्ये पुणे विभागात १५ जुलैपासून हा प्रवासी दिन साजरा करण्यात आला. बससेवेची गुणवत्ता वाढविण्यासाठी आणि प्रवाशांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रत्येक आगारात १५ जुलैपासून प्रवासी राजा दिन उपक्रम सुरू केला आहे. त्यामध्ये प्रवाशांना एसटी मधून प्रवास करताना आलेल्या अडचणी अथवा काही तक्रार असेलतर थेट आगारात देऊ शकता.



त्यामुळे आता प्रवाशांच्या प्रत्येक समस्या आगारातच सुटणार आहे. एसटी बसमधून सध्या प्रवाशांची संख्या वाढली आहे. त्यात महिलांना सवलत दिल्याने महिला प्रवाशी संख्या वाढल्याने बसस्थानक मधील शौचालयेही स्वच्छ असायला पाहिजे. त्यादृष्टीने या उपक्रमातून बसस्थानक शौचालयही स्वच्छ राहण्यास मदत होईल.

एसटीमधून प्रवास करताना प्रवाशांना स्वच्छतागृहापासून ते तिकीट काढणे असो अथवा वेळेत बस येत नसेल. अशा अन्य समस्यांना आता वाचा फोडली जाणार आहे. यासाठी एसटी महामंडळांनी थेट प्रवाशी दिन सुरू केल्याने आता प्रवाशांना थेट आगारात तक्रार करता येणार आहे.

प्रवेश सुरु...! औधोगिक प्रशिक्षण
MSSDS
*इलेक्ट्रिशियन - वायरमन
*फॅशन डिझायनर
*अ‍ॅडव्हान्स लेडीज टेलर
*डीझेल मॅकेनिक
SWARAJYA SDI
Reg.No MH-F/23712, ITES/MH 1541
आमची वैशिष्ट्ये
* प्रशिक्षित प्रशिक्षक व आद्यवत सुसज्ज प्रशिक्षण वर्ग.
* उद्योग विषयी पूरक अभ्यासक्रम.
* व्यक्तिगत कौशल्य विकास, सॉफ्टस्किल विषयाचे मार्गदर्शन मिळेल.
* अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर नोकरी, व्यवसायाची संधी बरोबरच शासनाचे (स्किल इंडिया) सर्टिफिकेट मिळेल.
शैक्षणिक पात्रता
८ वी ते १२ वी पास / नापास
पत्ता:
स्वराज्य स्किल डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूट
एस.टी. स्टँड समोर, पवार हॉस्पिटल शेजारी,करमाळा
मोबाईल नंबर: ९६ ६५ ७८ ९३ ९३

पुनम एजन्सी
अंबुजा सिमेंटचे
करमाळा तालुका वितरक
• बिल्डींग मटेरियल सप्लायर्स • प्लंबींग • हार्डवेअर
स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट
होलसेल व रिटेल योग्य दरात मिळेल
Ambuja Cement
प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ता: बायपास रोड, जेऊर.

### उजनी बॅकवॉटर परिसरात दळणवळण व्यवस्था मजबुतीसाठी

# उजनी जलाशयात पुल उभारणीची गरज : दिग्विजय बागल




करमाळा(सं.प्र.) : उजनी बॅकवॉटर परिसरातील दळणवळण व्यवस्था मजबुत करण्यासाठी गोयेगाव, पोमलवाडी, ढोकरी येथे उजनी जलाशयात पुल उभारणी करणे गरजेचे असून यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेकडे आग्रही मागणी करणार; असे प्रतिपादन मकाई कारखान्याचे माजी चेअरमन दिग्विजय बागल यांनी केले.

वाशिंबे येथे बागल गटाच्या वतीने आयोजित कार्यकर्ता मेळाव्यात श्री.बागल बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजाभाऊ जगदाळे हे होते. पुढे बोलताना श्री.बागल म्हणाले, की उजनी धरणात अनेक गावांना जलसमाधी मिळाली. हजारो एकर शेतजमीन व घरेदारे पाण्यात गेली. यासाठी सर्वात मोठा त्याग येथील धरणग्रस्त शेतकऱ्यांनी केला. परंतु उजनी बॅकवॉटर परिसरातील गावांना हाकेच्या अंतरावर जाण्यासाठी ८० ते ९० किलोमीटरहून अधिक वळसा घालून प्रवास करावा लागत आहे. परिणामी होडीतून जीवघेणा प्रवास करावा लागतो. या धोकादायक प्रवासाने ४० हून अधिक जणांना जलसमाधी मिळाली आहे. पुनर्वसनानंतर या ठिकाणी दळणवळणासाठी पर्यायी मार्गाची व्यवस्था झाली नाही. त्यामुळे गोयेगाव, पोमलवाडी, ढोकरी येथे पुल होणे गरजेचे असून ते आपल्या हक्काचे आहे; असेही श्री.बागल यांनी सांगितले. यावेळी मकाईचे चेअरमन दिनेश भांडवलकर, संचालक बाळासाहेब पांढरे, कल्याण शिंदे, जाकीर शेख, विलास झोळ, सतीश नीळ, युवराज रोकडे, रामभाऊ हाके, जगदीश पवार, गणेश झोळ, शैलेश झोळ, बाजार समितीचे माजी उपसभापती चिंतामणी जगताप, राजेंद्र मोहोळकर, महेश तळेकर, काशिनाथ काकडे, अजित झांजुर्णे, विलास काटे, रेवणनाथ निकत, अशोक पाटील, आदिनाथचे माजी संचालक नामदेव भोगे, दत्तात्रय सरडे, विजय गोडगे, बाळासाहेब सरडे, संतोष पाटील, देवानंद ढेरे यांचेसह बागल गटाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# राजुरी येथील सटवाई देवस्थान सुशोभिकरणासाठी पाच लाख निधी




करमाळा(सं.प्र.) : आमदार संजयमामा शिंदे यांच्या आमदार निधीतून राजुरी गावातील सटवाई देवस्थानाचे सुशोभिकरणासाठी पाच लाख रुपये निधी मंजूर केला आहे. यामध्ये सटवाई देवीच्या जागेत पेव्हर ब्लॉक आणि देवीकडे जाण्यासाठी पायऱ्या अशा कामाचे स्वरुप आहे. तसेच दिलीप साखरे यांच्या घराजवळील चौकापर्यंत रस्त्याचे मुरूमीकरण यासाठी निधी मंजूर करण्यात आला. या कामाचे उद्घाटन राजुरी ग्रामस्थांचे वतीने आणि कॉन्ट्रॅक्टर यांचे हस्ते झाले. गावभेट दौऱ्यावेळी आ.शिंदे यांना राजुरी ग्रामस्थांनी या कामाची मागणी केली होती. आ.शिंदे यांनी दिलेला शब्द पूर्ण केल्याबद्दल राजुरी ग्रामस्थांनी त्यांचे विशेष आभार मानले.

इंदापूर(जि.पुणे) येथील सुप्रसिध्द
त्वचारोग, गुप्तरोग तज्ञ
**डॉ.महेश तानाजी रुपनवर**
MBBS. DDV(Bombay)
वेळ :सकाळी १० ते ११.३०
महिन्यातील दुसऱ्या व चौथ्या शनिवारी
**घोलप हॉस्पिटल**
करमाळा, जि.सोलापूर येथे उपलब्ध !
Facilities...
- गुप्तरोग उपचार व सल्ला
- Ance(pimples) Treatment
- Ance Scar Treatment
- Melasma • Hair Loss
- Hyper Pigment Treatment
- Skin Whitening
- Under Eye Dark Circles
- Skin Tag, Wart Removel
- Dandruff Treatment
- Tatto Removel by Laser
- Fangal infection, Leprosy Psriasis, Eczema
- Unwanted Hair Removel by Laser
- Skin Glow, Polishing Skin Rejuvenation
- Anti Aging • Medicated Facial




नावनोंदणीसाठी संपर्क : मो.8483822200/9421062073

खुशखबर मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको नगर-बारामती-सोलापूर खुशखबर



बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
**डॉ.विकास देविदास नागरगोजे** (एम.एस.मुंबई)



आता आपल्या **करमाळ्यात !**
उपलब्ध सुविधा...
- मुळव्याधवर इंजेक्शन • डिलीव्हरीनंतर उद्भवारे कोंब
- एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्भवणारे कोंब
- संडासवाटे रक्त येणे, पु येणे • संडासची जागा बाहेर पडणे
- संडास जागी खाज व आग होणे • संडासाचा नागवेडा
- संडास नंतर बसण्यास त्रास होणे • भगंदर, फिशर
- चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)

ओपीडी /ऑपरेशन ठिकाण
दर गुरुवार व सोमवार
वेळ : सकाळी ९.०० ते १२.००
**लोकरे हॉस्पिटल**
कृष्णाजीनगर, बायपास रोड करमाळा., जि.सोलापूर
(९८५०८५१००५)

परिचय
डॉ.विकास देविदास नागरगोजे
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई



विशेष सुचना...
१. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रुग्णांची तपासणी करण्यात येईल.
२. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे.
३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील.
४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य.
५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.

नाव नोंदणीसाठी संपर्क
मो.9763035862

बार्शी **धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल** कोर्ट समोर, बार्शी.

# एकनाथ शिंदे यांना दुसऱ्यांदा मुख्यमंत्री करण्यासाठी कामाला लागा : ज्योतीताई वाघमारे




करमाळा(सं.प्र.) : संवेदनशील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गेल्या अडीच वर्षात विकासाचा महापूर महाराष्ट्रात आणला असून, शासनाचा पैसा कष्टकरी शेतकरी, शेतमजूर महिला यांच्यापर्यंत पोहोचवला आहे. देशात एक नंबरचे राज्य करण्यासाठी एकनाथ शिंदे यांना दुसऱ्यांदा मुख्यमंत्री होणे गरजेचे आहे. त्यासाठी प्रत्येक शिवसैनिकांनी कामाला लागावे; असे आवाहन शिवसेनेच्या प्रवक्ते ज्योतीताई वाघमारे यांनी केले.

करमाळा येथे ४०१ बांधकाम कामगारांना दुसऱ्या टप्प्यातील जवळपास ४३ लाख रुपये किंमतीचे भांडी संसारपयोगी साहित्य वाटण्यात आली. यावेळी व्यासपीठावर मुख्यमंत्री वैद्यकिय सहाय्यता कक्ष प्रमुख मंगेश चिवटे, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख प्रियदर्शन साळी, तालुकाप्रमुख राहुल कानगुडे, शहरप्रमुख संजय शिलवंत, जेऊरचे बाळासाहेब कर्चे, माधव सुर्यवंशी, युवा सेना तालुकाप्रमुख नवनाथ गुंड, नागेश शेंडगे, संजय जगताप, प्रदीप बनसोडे, शिवसेनेचे कायदेशीर सल्लागार ॲड.शिरीष लोणकर, उद्योगपती संतोष गुगळे, निलेश चव्हाण आदी पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी २८०० बांधकाम कामगार नोंदणी केल्याबद्दल शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांचा सत्कार ज्योतीताई शिंदे यांचे हस्ते करण्यात आला.

यावेळी बोलताना वाघमारे म्हणाल्या, की शिंदे सरकारने लाडकी बहिण, मोफत एसटी प्रवास, पिक विमा, पीक लागवडीसाठी अनुदान, शेतकऱ्यांना मोफत वीज अशा विविध योजना शेतकऱ्यांना मदत करणाऱ्या निर्माण केल्या आहेत. करमाळ्यातूनही शिवसेनेचा उमेदवार निवडून देणे काळाची गरज आहे. मुख्यमंत्री शिंदे यांची लाडकी बहिण म्हणून तालुक्यातील प्रत्येक महिलेने करमाळ्यातून शिवसेनेचा धनुष्यबाणाचा उमेदवार निवडून आणण्यासाठी प्रयत्न करावा; असे आवाहन केले.


यावेळी मंगेश चिवटे यांनी मुख्यमंत्री शिंदे हे जातपात धर्म न मानता सर्वसामान्य नागरीक डोळ्यापुढे ठेवून काम करतात; असे सांगितले. यावेळी जिल्हाप्रमुख महेश चिवटे म्हणाले, की करमाळा तालुक्यातील रूग्णांना आत्तापर्यंत १ कोटी ३० लाख रूपयांची आर्थिक मदत शिवसेना वैद्यकिय मदत कक्ष द्वारे मिळवून दिली आहे. शासनाच्या विविध माध्यमातून कोट्यावधी रुपयाची थेट आर्थिक मदत सर्वसामान्यांना मिळाली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून करमाळ्यातील शिवसेनेच्या कार्यालयातून राज्य शासनाच्या सर्व योजनांची माहिती व मोफत अर्ज भरून दिले जातात याचा फायदा जनतेने घ्यावा.

फ्रेश ॲन्ड प्युअर
**डेअरी फ्रेश** मिल्क



दुध, कुल्फी, लस्सी, श्रीखंड, आम्रखंड,पनीर, ताक, खवा, तुप, क्रीम मिळण्याचे ठिकाण
**चिवटे उपहारगृह** राशिनपेठ, करमाळा. (मो.८८८८१४७००५)


आशिर्वाद
आशिर्वाद
आशिर्वाद
वाढदिवस शुभेच्छा
विकासप्रिय आमदार
माजी उपनगराध्यक्ष
सावंत गटनेते
माजी नगरसेवक
सदस्य - जिल्हा नियोजन समिती, सोलापूर,
माजी सदस्य - पंचायत समितीचे माजी सदस्य
अध्यक्ष - हमाल पंचायत
ॲड.राहुल सुभाषराव सावंत
आपणांस दि.२१ जुलै रोजी असलेल्या वाढदिवसास
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
श्री छत्रपती शिवाजी तरूण मंडळ सावंत गल्ली, करमाळा.


भावपूर्ण श्रध्दांजली
कै.श्रीरंग भिवा अनारसे
(मृत्यू दि.१०/७/२०२४)
काळाचा महिमा काळच जाणे,
कठीण तुमचे अचानक जाणे,
आजही घुमतो स्वर तुमचा कानी,
वाहताना श्रध्दांजली डोळ्यात येते पाणी
आमचे पिताश्री व आदर्श शिक्षक
कै.श्रीरंग भिवा अनारसे यांचे नुकतेच वृध्दपकाळाने निधन झाले.
परमेश्वर त्यांचे आत्म्यास चिरशांती देवो; हीच आमची भावपूर्ण श्रध्दांजली !
शोकाकुल
श्रीमती कलावती श्रीरंग अनारसे, डॉ.हेमंत श्रीरंग अनारसे
डॉ.प्रमोद श्रीरंग अनारसे व समस्त अनारसे परिवार, वीट


Galaxy Building Construction
Owner - Rohit Rakhunde
Contact - 9595956065
Twin Banglow
( 2bhk )
BOOK NOW
Address - karjat Road , karmala , dist-Solapur
नव्याने बांधकाम केलेले सर्व सोयीनेयुक्त
त्वरीत बुक करा..!
दोन बंगले विक्रीसाठी उपलब्ध !
संपर्क : 9595956065


22 Jully
विकासप्रिय आमदार
ता.अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी
राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष
महाराष्ट्र राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री
मा.ना.अजित(दादा) पवार
आपणांस वाढदिवसाच्या मन:पूर्वक..
हार्दिक शुभेच्छा...
शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी
श्री.दत्ता फंड
श्री.भरत(भाऊ) आवताडे (उद्योजक)
शुभेच्छुक
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी
करमाळा तालुका (सर्व पदाधिकारी)

# नामसाधना प्राथमिक विद्यामंदिर तर्फे दिंडी सोहळा साजरा




करमाळा(सं.प्र.) : येथील नामसाधना प्राथमिक विद्यामंदिर न.पा.सेंट्रल स्कुल मुले नं.१ या शाळेच्या वतीने दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक कार्यकर्ते श्रेणिक खाटेर, माजी नगरसेविका संगीता खाटेर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा डॉ.वर्षा करंजकर, केंद्रसमन्वयक दयानंद चौधरी आदी मान्यवरांच्या उपस्थितीत संत ज्ञानेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन करून दिंडीचा शुभारंभ करण्यात आला. वाद्यवृंदाच्या मधूर संगीतावर व हलगीच्या तालावर टाळाच्या गजरात बालवारकरी झेंडेकरी मुखाने ज्ञानोबा तुकोबाचा जयघोष करत होते. सर्वात पुढे बॅन्डपथक, घोडेस्वार झेंडेकरी व वारकरी, रथामध्ये विठ्ठल रुक्मीणी, ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, एकनाथ, सोपानदेव, गोराकुंभार, स्वामी रामदास, चांगदेव, मुक्ताबाई, जनाबाई आदी संताच्या वेशभुषेत विद्यार्थी विराजमान होते. तसेच दिंडी प्रमुख, मृदंग वादक, वासुदेव, पोलीस, भालदार, चोपदार, घोडेस्वार अशा वेगवेगळ्या भुमिका विद्यार्थ्यांनी साकारल्या. हा दिंडी सोहळा यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका सुनंदा जाधव यांचेसह शाळेतील सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले. या दिंडी सोहळ्यात पालकवर्गही मोठ्या संख्येने सहभागी झाला होता.

करमाळा व परिसरातील त्वचा रूग्णांच्या सेवेसाठी
सोलापूर येथील त्वचारोग तज्ञ
**डॉ.संकेत मंडलेचा** MBBS, DDV (Pune)
प्रत्येक महिन्याचा दुसरा व चौथा शुक्रवारी सकाळी १० ते दु. २ पर्यंत


**त्वचा विकार :** नायटा/गजकर्ण, इसब, खरूज, काळे डाग, सोरायसिस, पिंपल्स, चाई, कोंडा, स्ट्रेचमार्क, केस गळती, जुनाट खाज, ॲलर्जी, अतिरिक्त घाम येणे, वांग, नागिण, कांजण्या,नखांचे आजार, सुरमा इ.आजारांवर खात्रीशीर उपचार व सल्ला
संपर्क : डॉ.सारंगकर डेंटल क्लिनिक
करमाळा-जेऊर रोड, कॉटेज हॉस्पिटल समोर, करमाळा., जि.सोलापूर
अपॉईंटमेंट : मो.9423333904

# नवभारत इंग्लीश स्कुल मध्ये दिंडी सोहळा साजरा



करमाळा(सं.प्र.) : श्री गिरधरदास देवी प्रतिष्ठान संचलित नवभारत इंग्लीश स्कुलमध्ये दिंडी सोहळा साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास सर्व विद्यार्थी वारकरी पोशाखात उपस्थित होते. ढोल, टाळ व विद्यार्थ्यांनी केलेल्या विठुरायाच्या नामघोषाने पूर्ण वातावरण दुमदुमून गेले होते. दिंडी सुरुवात संस्थेचे अध्यक्ष कन्हैयालाल देवी, सुनिता देवी, मुख्याध्यापिका सुनिता मोहिते, स्नेहल कटारिया, शेखर वाशिंबेकर व पंकज ढाळे यांचे हस्ते पालखीचे पूजन करून करण्यात आली. याप्रसंगी अमोद संचेती, चंद्रकांत देवी, विजयकुमार दोशी, निर्मला देवी, राजकुमार दोशी, प्रितम दोशी, सागर गायकवाड, प्रदीप चुंग, संदीप चुंग, अभिजीत वाशिंबेकर व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दत्तमंदिर विकासनगर येथे प्रज्योत दोशी व आरती दोशी यांचे हस्ते आरती व खाऊ वाटपाने दिंडीची सांगता झाली.

## सामाजिक संदेश देणारी
# इरा पब्लिक स्कुलची बालदिंडी



करमाळा(सं.प्र.) : चिखलठाण येथील न्यु इरा पब्लिक स्कुलच्यावतीने बालदिंडी काढून सामाजिक संदेश दिला. या दिंडीत विद्यार्थी विविध वेशभूषा परिधान करून व हातात झाडे लावा-झाडे जगवा, बेटी बचाओ-बेढी पढाओ, निसर्गाचे संरक्षण, अंधश्रध्दा निर्मुलन आदी सामाजिक संदेश देणारे फलक घेऊन सहभागी झाले होते. या सोहळ्यात सर्वात महत्वाचे आकर्षण म्हणजे अश्व रिंगण सोहळा ठरला. दिंडी सोहळा यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष ब्रिजेश बारकुंड, सचिव सुनिल अवसरे, मुख्याध्यापक कसबे, सर्व शिक्षक, कर्मचारी, ड्रायव्हर आदींनी परिश्रम घेतले.

# गाडेवस्ती शाळेची साक्षरता दिंडी



करमाळा(सं.प्र.) : आषाढी एकादशी निमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गाडेवस्ती यांचे वतीने साक्षरता दिंडी काढून या उपक्रमाद्वारे नागरीकांना साक्षरतेचा संदेश दिला. या दिंडी विद्यार्थी विठ्ठल, रुक्मीणी, तुकाराम, जनाबाई, वारकरी वेशभुषा परिधान करून सहभागी झाली. दिंडीद्वारे झाडे लावा-झाडे जगवा, बेटी बचाव-बेटी पढाओ.. इ. सामाजिक संदेश देणाऱ्या घोषणा देत सर्व परिसर दुमदूमन गेला होता. जानाई मंदिर परिसरात महिला व पुरुष यांनी भजन, भारूड, अभंग गायिले. फुगड्या खेळल्या. पखवाज वादक महादू गणगे यांनी मोलाची साथ दिली. भेळ वाटप करून दिंडीची सांगता झाली. हा दिंडी सोहळा यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक वैशाली शेटे, सहशिक्षिका मनिषा जाधव, अंगणवाडीच्या चांदणे मॅडम यांनी परिश्रम घेतले.

# मांगी जि.प.शाळेच्या बालदिंडीतून साक्षरता जनजागृती



करमाळा(सं.प्र.) : मांगी जिल्हापरिषद प्राथमिक शाळेच्या वतीने बालदिंडी काढून दिंडीद्वारे विद्यार्थ्यांनी साक्षरतेविषयी जनजागृती केली. या दिंडीत शिक्षक, माता-पालक, ग्रामस्थ व विद्यार्थी विविध वेशभुषा परिधान करून सहभागी झाले होते. हातात टाळ आणि पताका घेत विठ्ठल नामाचा गजर करत मांगी गावातून ही दिंडी काढण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक हिरामन कौले, उपशिक्षिका वैशाली पवार, सुवर्णा महामुनी, आशा देमुंडे, अंगणवाडी सेविका संचेती, सामाजिक कार्यकर्ते सुजित बागल व ग्रामस्थ उपस्थित होते.

# सेवानिवृत्त बिलीफ गंगाधर भिडे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन



करमाळा(सं.प्र.) : किल्ला विभाग येथील रहिवाशी (सध्या रा.नागोबा मंदिरासमोर) व सेवानिवृत्त बिलीफ गंगाधर भिडे (वय-६५) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने सायंकाळी पाच वाजता निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुली, दोन मुले असा परिवार आहे. अंत्यविधीप्रसंगी सर्व स्तरातील नागरीक उपस्थित होते.

**साई स्टील रेलिंग & किचन ट्रॉलीज्**
सर्व प्रकारचे स्टील रेलींग, मेनगेट किचन ट्रॉलीची सर्व कामे खात्रीशीर व वेळेवर करून मिळतील.

प्रोप्रा : प्रशांत जोशी मो.9881028191 / 7798304502
पत्ता : सय्यद कॉम्प्लेक्स, करमाळा-नगर रोड, बायपास, करमाळा.

**श्रीजी इस्टेट एजन्सी**
लक्ष्मीकांत देवी (9421063525, 8805633525)
- घरजागा, दुकान जागा
- प्लॉट व बंगले
- जमीन बिनशेती करणे
- व्यवहार करून दिले जातील
- सरकारी दस्तऐवजची कागदपत्र घरपोहोच केली जातील.

पत्ता : मेनरोड, करमाळा.

# मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून विविध रस्त्यांना मंजुरी द्यावी

## भाजपाच्या रश्मी बागल यांचे मुख्यमंत्री यांना निवेदन



करमाळा(सं.प्र.) : करमाळा मतदारसंघातील विविध रस्त्यांना मुख्यमंत्री ग्राम-सडक योजनेतून मंजुरी देण्यात यावी; अशी मागणी भाजपाच्या महिला प्रदेश उपाध्यक्षा रश्मी बागल यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

रश्मी बागल यांनी करमाळा मतदार संघातील विविध विकास कामांचा मंत्रालयीन पातळीवर पाठपुरावा करून नवीन कामांना मंजुरीसाठी जोरदार प्रयत्न सुरू केले असून, याचाच एक भाग म्हणून करमाळा तालुक्यातील देवळाली ते वीट रस्ता, पांडे ते अर्जुननगर रस्ता, करंजे ते भालेवाडी रस्ता, वांगी नं.२ रस्ता, रावगाव ते राखवाडी रस्ता, रामवाडी कावळवाडी ते जिंती रस्ता हे रस्ते वाहतुकीच्या दृष्टीने खराब झाले असून त्यांची अवस्था दयनीय झाल्याने मुख्यमंत्री सडक योजनेतून या रस्त्याच्या कामाला तात्काळ मंजुरी मिळून संबंधितांना आदेश देण्याची मागणी रश्मी बागल यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचेकडे केली आहे.

सध्या तालुक्यातील विविध विकास कामांसाठी आठवड्यातून किमान दोन दिवस मुंबईला जाऊन संबंधित विभागाच्या मंत्र्यांच्या व अधिकाऱ्यांच्या भेटी घेऊन तालुक्यातील अडचणी मार्गी लावण्याचा प्रयत्न रश्मी बागल यांच्या माध्यमातून केला जात आहे.

# उमरड शाळेची प्रबोधनात्मक बालदिंडी



करमाळा(सं.प्र.) : उमरड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त प्रबोधनात्मक साक्षरता बालदिंडी काढण्यात आली. दिंडीत विद्यार्थी विठ्ठल-रूक्मीणी, संत, वारकरी च्या वेशभुषेत सहभागी झाली होते. या दिंडीद्वारे विद्यार्थ्यांनी साक्षर जनता-भूषण भारता, अक्षर कळे-संकट टळे, बालकांचे शिक्षण-देशाचे रक्षण, अ ब क ड शिकूया - देशाचा मान वाढवूया... इ. फलकातून शिक्षणा-विषयी जनजागृती केली. दिंडी मार्गक्रमणात शिक्षण, स्वच्छता, आरोग्य याविषयी घोषणा देण्यात आल्या. या दिंडीत गावातील सर्व स्तरातील नागरीक सहभागी झाले होते. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक अंकुश अमृळे, अनिल यादव, दिलीप भोसले, बापूसाहेब भोसले, मुकूंद राऊत, मेघना साळुंखे, छाया वाघमारे यांनी परिश्रम घेतले.

## जयप्रकाश बिले पब्लिक स्कुल तर्फे

# दिंडी सोहळा साजरा



करमाळा(सं.प्र.) : झरे येथील जयप्रकाश बिले पब्लिक स्कुलच्या वतीने भक्तीमय वातावरणात दिंडी सोहळा साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध कला सादर केल्या. यामध्ये रिंगण, फुगडी, काटवट, भक्तीगीते, नृत्य, पारंपारिक कलाविष्कारांचा समावेश होता. तसेच अनेक विद्यार्थ्यांनी विविध संतांची रूपे साकारली. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष जयप्रकाश बिले, खजिनदार आशाताई बिले यांनी सर्व बालगोपाळ वारकऱ्यांना शुभेच्छा दिल्या. सचिव युवराज बिले, संचालिका डॉ.स्वाती बिले, अनिलशेठ कादगे यांनी विठ्ठल-रूक्मीणीची विधिवत पुजा केली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्कुलचे सर्व शिक्षक, कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# निंभोरे येथे आण्णाभाऊ साठे यांची पुण्यतिथी साजरी

करमाळा (सं.प्र.) : निंभोरे येथे लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. आण्णाभाऊ साठेनगर येथील युवकांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरूवात झाली. दिपक गवळी यांनी उपस्थितांचे स्वागत केले. नितीन गायकवाड यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमास सरपंच रविंद्र वळेकर, पोलीस उपनिरीक्षक हनुमंत वाघमारे, ग्रा.स.धनंजय वळेकर, आण्णा सावंत, दिपक गवळी, आर.व्ही.ग्रुपचे अध्यक्ष पप्पू मस्के, भाऊसाहेब वाघमारे तसेच वाघमारे, खाडे, चांदणे, भिसे, शिंदे परिवार, अडसुळ, गायकवाड परिवारातील सदस्य उपस्थित होते.

डोळ्यांचा दवाखाना
डॉ.नायकुडे यांचे
श्रीजय नेत्र रुग्णालय
डॉ.सौ.भाग्यश्री रामकृष्ण नायकुडे. M.S.(Ayu.) Gold Medalist नेत्रतज्ञ व शल्य चिकित्सक
श्री कमलादेवी रोड, कृष्णाजीनगर करमाळा.मो.9834071218 / 9921013493
दवाखान्याची वेळ-सोमवार ते शनिवार सकाळी १०.३० ते रात्री ९.०० पर्यंत
रविवार- सकाळी १० ते दु.२ वाजेपर्यंत
इमर्जन्सी सेवा उपलब्ध
उपलब्ध सुविधा
मोतीबिंदू (Catract) आधुनिक मशिनव्दारे शस्त्रक्रिया
डोळ्यांवरील पडदा, तिरळेपणा, लासूर शस्त्रक्रिया उपलब्ध
Nd YAG लेसर सुविधा उपलब्ध
श्रीजय ऑप्टिकल सर्व प्रकारचे चष्मे तयार करून मिळतील.

## लेखापाल पदी नियुक्ती झाल्याबद्दल

# मिनाज घोणे हिचा सत्कार



करमाळा(सं.प्र.) : सन २०२३ मध्ये वनविभाग मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेत कुंकू गल्ली येथील रहिवाशी असलेली मिनाज उस्मान घोणे हिची लेखापाल म्हणून निवड झाली आहे. या निवडीबद्दल करमाळा शहरातील खाटीक गल्ली येथील मुस्लिम खाटीक बक्कर जमात च्या वतीने मिनाज घोणे हिचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हाजी अली महंमद हाजी फरीद (मुंबई) व स्वागताध्यक्ष हाजी मज्जिद घोडके हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जयप्रकाश बिले पब्लिक स्कुलच्या शिक्षिका नफिसा घोणे यांनी केले. यावेळी घोणे यांनी शिक्षणाचे महत्व समजावून सांगून आपल्या समाजातील पालकांनी मुलांना शिक्षणासाठी प्रवृत्त करावे. मुलींना उच्च शिक्षण कसे द्यावे; याविषयी मार्गदर्शन केले. मिनाज घोणे यांनी या पदापर्यंत पोहचण्यासाठी झालेला खडतर प्रवास सांगितला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन वसीम घोडके यांनी केले तर उपस्थितांचे आभार शहानवाज घोणे यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इम्रान घोडके, जाफर घोडके, मुनाफ घोडके, सिराज घोडके, अकबर घोडके, शब्बीर घोडके, मोहसीन वस्ताद, मुसा कुरेशी, सलमान घोडके, जिदान शेख आदींनी केले.

# मोहरम सण उत्साहात साजरा



करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरात मोहरमचा सण उत्साहात व शांततेत पार पडला. मोहरम निमित्त भुईकोट किल्ला येथे मानाची नालसाहेब सवारी तर कुंभारवाडा येथे अल्लाउद्दीन साहेब सवारी, मोहिद्दीन तालीम सवारी, पंजाब वस्ताद चौक येथे कुरेशी सवारी, सुतार तालीम येथे पाच पंजे सवारी, खाटीक गल्ली येथे नाले हैदर सवारी, भवानीपेठेत लालन सवारी, मोहल्ला गल्ली येथे फरीद मास्तर सवारी, रंभापुरा येथे दुधा यांची सवारी, खडकपुरा येथे माहुले सवारी, मौलालीमाळ येथे मदारी समाजाची सवारी आदी ठिकाणी सवारीची प्रतिष्ठापना करण्यात आली होती. तसेच डोलेही बसवण्यात आले होते. १३ ते १७ जुलै दरम्यान सर्व सवारीची शांततेत शहरातून मिरवणूक काढण्यात आली. मोहरम दिनी मानाची नालसाहेब यांच्या सवारीची शहरातील प्रमुख मार्गावरून सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. हिंदु-मुस्लिम समाजाचे ऐक्य म्हणून समजले जाणारी कुंभार समाजाची सवारीची शहरातील प्रमुख मार्गावरून सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. हा सण यशस्वी साजरा करण्यासाठी मोहरम कमिटीचे अध्यक्ष व माजी नगरसेवक अल्ताफशेठ तांबोळी, माजी नगराध्यक्ष शौकत नालबंद, फारूक जमादार, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर उपाध्यक्ष आझाद शेख, सदस्य जाकीर वस्ताद, जाफर घोडके, सोहेल पठाण, समीर शेख, अलिम शेख, अरबाज बेग, मुस्तकीन पठाण, सुर्यकांत चिवटे, मोहन परदेशी, उमर मदारी, मोहंमद हाफिज कुरेशी, बबन दुधाट, दस्तगीर पठाण, माहुले, हलवाई आदींनी परिश्रम घेतले.

श्री गजानन अगरबत्ती
• सुगंधी अगरबत्ती • कापूर
• अत्तर • धूप • भीमसेन कापूर,
• विविध कलरची रांगोळी
• सर्व प्रकारचे लोबन,
• सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य
योग्य दरात मिळेल !
पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)

आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर
रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर
अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
• सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरुस्तीचे ठिकाण
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.
मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)
दर महिन्याचा तिसरा रविवारी शिबीर वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२

# लालबहाद्दुर शास्त्री विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



करमाळा(सं.प्र.): न्यु यशवंत शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सालसे येथील लालबहाद्दूर शास्त्री विद्यालयात दहावी मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार प्रशालेच्या वतीने सचिव रविंद्र सपकाळ यांचे हस्ते करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे उपाध्यक्ष मनिषा तनपुरे, संचालक अनिल घाडगे, शाळा व्यवस्थापन समिती चे उपाध्यक्ष तानाजी लोकरे, सतीश रूपनवर, शरद पवार, लहू येवले, वैभव घाडगे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी दहावीतील गुणवंत विद्यार्थी समृध्दी गोंडगिरे (९४.४०) आर्यन हांडे (९३.६०), पायल वायकुळे (९२.४०)या तीन विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच आठवी मधील एनएमएमएस परीक्षेत सारथी शिष्यवृत्ती प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार केला. सुत्रसंचालन घाडगे सर यांनी केले.

# ज्येष्ठांनी आरोग्यसंपन्न रहावे : जयवंत नलवडे

करमाळा(सं.प्र.) : ज्येष्ठांनी आपल्या आरोग्याची नियमित काळजी घ्यावी. त्यासाठी योग्य आहार, नियमित व्यायाम, पुरेसे पाणी व झोप घ्यावी व आरोग्य संपन्न रहावे. त्यासाठी सकारात्मक दृष्टीकोन अपेक्षित आहे; असे मत गटशिक्षणाधिकारी जयवंत नलवडे यांनी केले.

सेवानिवृत्त कर्मचारी संघ करमाळा यांचे वतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमात श्री.नलवडे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षक विष्णू डुकरे हे होते. या कार्यक्रमात वयाची ८० वर्षे पूर्ण झालेल्या किंवा त्यापेक्षा जास्त वयाच्या ७५ सेवानिवृत्त सभासदांचा शाल, श्रीफळ गुलाबपुष्प देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पंडित घाडगे गुरूजी यांनी केले. संस्थेचा वार्षिक अहवाल व वर्षभरातील कार्यपध्दती संस्थेचे अध्यक्ष भागवत घाडगे गुरूजी यांनी सादर केली. सुत्रसंचालन नारायण घोलप यांनी केले तर उपस्थितांचे आभार हरिभाऊ फंड यांनी मानले. यावेळी सिध्देश्वर मनसुके, परबत जाधव, डॉ.येवले यांचेसह सेवानिवृत्त कर्मचारी संघाचे सर्व सदस्य उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दशरथ ननवरे, बाबूराव साडेकर, बापूराव जाधव, महादेव राऊत, दत्तात्रय चोपडे यांनी परिश्रम घेतले.

# मराठा योध्दा मनोज जरांगे-पाटील यांची प्रा.झोळ यांनी घेतली भेट



करमाळा (सं.प्र.) : मराठा योध्दा मनोज जरांगे-पाटील यांची अंतरवाली सराटी येथे दत्तकला शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा.रामदास झोळ यांनी नुकतीच भेट घेतली. यावेळी मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना येणाऱ्या शैक्षणिक अडचणीविषयी मनोज जरांगे-पाटील आणि झोळ सर यांच्यामध्ये मुद्देसूद चर्चा झाली. यामध्ये आता मराठा समाजातील विद्यार्थ्यांना येणाऱ्या शैक्षणिक अडचणी तसेच एसबीसी, एसईबीसी, ओबीसी, एनटी समाजाच्या विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी विषयी प्रा.झोळ यांनी जरांगे-पाटील यांच्यासोबत सखोल चर्चा केली. मराठा आरक्षणाचा मुद्दा राज्यामध्ये सर्वाधिक चर्चेचा आणि महत्वाचा असल्याने येत्या काळामध्ये शैक्षणिकदृष्ट्या सरकारकडे मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणींविषयी सरकारकडे कोणत्या प्रकारची मागणी असायला हवी तसेच समाजाच्या काय अडचणी आहेत हे मनोज जरांगे-पाटील व प्रा.झोळ यांच्या मध्ये झालेल्या चर्चेचे प्रमुख मुद्दे होते.

फ्लॅट भाड्याने देणे आहे

करमाळा शहरातील बागवानगर येथे सर्वसोयीनेयुक्त असलेले तीन फ्लॅट फॅमिलीसाठी भाड्याने देणे आहे

संपर्क : मो.9423334154, 9423334182

खुली जागा विकणे आहे

किल्ला विभाग येथील श्रीराम मंदिराच्या मागील बाजूस असलेली खुली जागा योग्य किंमतीत त्वरीत विकणे आहे.

संपर्क : मो.9511918695

श्री स्वामी समर्थ सेवा मार्गातील

# २१ जुलैला तेली गल्ली येथे गुरू पौर्णिमा महोत्सव

करमाळा(सं.प्र.) : श्री स्वामी समर्थ स्वरूप प.प. गुरूमाऊली यांच्या आशिर्वादाने व गुरूवर्य गुरुपुत्र चंद्रकांत मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली दिंडोरी प्रणित श्री स्वामी समर्थ सेवा मार्गातील गुरू पौर्णिमा महोत्सव २१ जुलैला स्वामी समर्थ सेवा केंद्र तेली गल्ली येथे आयोजित करण्यात आला आहे. हा महोत्सव सकाळी आठ ते रात्री आठ पर्यंत चालू राहणार आहे. यामध्ये सकाळी स्वामी समर्थ महाराजांची भुपाळी आरती, मूर्तीची पुजा व अभिषेक, साडेदहाची महानैवेद्य आरती, सायंकाळी सहा वाजता महानैवेद्य आरती इ.कार्यक्रम संपन्न होणार आहे. अभिषेक झाल्यानंतर ब्रह्मांडनायक श्री स्वामी समर्थ महाराज यांचे गुरू पद घेण्याचा कार्यक्रम होणार आहे. तसेच श्री स्वामी चरित्र सारामृत व श्री मल्हारी सप्तशती या ग्रंथांचे सामुदायिक पठण होणार आहे. तसेच विवाह नोंदणी, बेरोजगार नोंदणी, प्रश्नोत्तर सेवा, त्रिकाल आरत्या, मार्गदर्शन असेही उपक्रम होणार आहेत. महाराजांचे गुरूपद घेण्याचा अत्यंत महत्वाचा दिवस आहे. गुरूपद घेतले की वर्षभर महाराज आपला योगक्षेम चालवतात. तरी कोणीही ही संधी सोडू नये. जास्तीत जास्त सेवेकऱ्यांनी या सेवेमध्ये सहभागी व्हावे; असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# फिसरे येथील लक्ष्मण साबळे यांचे अल्पशा आजाराने निधन



करमाळा(सं.प्र.) : फिसरे येथील लक्ष्मण माणिक साबळे (वय-५२) यांचे १७ जुलैला अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या मागे आई, भाऊ, पत्नी, एक मुलगा असा परिवार आहे. त्यांच्या अंत्यविधी प्रसंगी सर्व क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कट्टर शिवसैनिक म्हणून त्यांची फिसरे परिसरात ओळख होती. त्यांचे निधनाबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

# जेऊर ते कुगाव रस्त्यासाठी २२ जुलैला रास्ता रोको

करमाळा(सं.प्र.) : तालुक्यातील अनेक गावांना जोडणारे रस्ते खूप खराब अवस्तेत असून नागरीकांना दररोज जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. जेऊर ते कुगाव दरम्यानच्या सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत येणाऱ्या मंजूर रस्त्याच्या गंभीर प्रश्नासंबंधी प्रशासनाला जाग आणण्यासाठी जगताप गटाचे युवा नेते शंभुराजे जगताप यांच्या नेतृत्वाखाली २२ जुलैला सकाळी अकरा वाजता नगर-टेंभूर्णी बायपास रोडवर जेऊर येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे.

शेटफळ, चिखलठाण नं.१ व २, केडगाव, कुगाव, पोफळज आदी गावांसाठी अत्यंत महत्वाचा रस्ता मंजूर असून प्रत्यक्ष कामाला सुरूवात मात्र होत नाही. या रस्त्यावर दिवसभर शाळकरी मुलांसह नागरीकांची वर्दळ असते. परिसरातील हजारो लोक जेऊर, करमाळा व इंदापूर सारख्या शहराकडे शाळा व इतर कामानिमित्त जातात.त्यांना या रस्त्याशिवाय दुसरा पर्याय नाही. कुगाव पासून सुमारे २४ किमी अंतर असलेल्या या रस्त्यावर चिखलठाण, शेटफळ, पोफळज, केडगाव इ. मोठी केळी व ऊस उत्पादन करणाऱ्या प्रयोगशील शेतकऱ्यांची गावे आहेत. याशिवाय चिखलठाण येथील श्री कोटलिंग मंदिर व कुगावची हनुमान जन्मभुमी असलेले हनुमान मंदिर ही धार्मिक स्थळे जोडलेली आहेत. हे अंतर पूर्ण करण्यासाठी दुचाकी वरून ४५ मि. ते १ तास तर चारचाकी वाहनाने १ ते १.३० तास लागतो. तसेच सदरचा रस्ता खराब असल्याने पावसाळ्यात या रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य निर्माण होते. त्यामुळे जेऊर ते कुगाव रस्त्याचे काम तात्काळ सुरू होणे गरजेचे आहे. या गंभीर प्रश्नी वाचा फोडण्यासाठी शंभुराजे जगताप यांचे नेतृत्वाखाली २२ जुलैला रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनात सर्व पक्ष, संघटना व सर्व गटाच्या कार्यकर्त्यांनी सहभागी व्हावे; असे आवाहन करण्यात आले आहे.

ऑफिस कामासाठी मुलगा पाहिजे

शैक्षणिक पात्रता : किमान १२ वी पास

संपर्क : 9011355389, 9822058106

## पिकअप अपघातात वृध्दाचे निधन

करमाळा(सं.प्र.) : पिकअप मागे घेत असताना न पाहिल्याने पिकअपखाली वृध्द सापडून त्याचे निधन झाले आहे. हा प्रकार ७ जुलैला सकाळी साडेसात वाजता नेरले येथे घडला आहे. यात बिरूदेव राजाराम गोफणे (रा.नेरले) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की ७ जुलैला सकाळी साडेसात वाजता माझे वडील राजाराम केरू गोफणे (वय-८१) हे प्रार्तविधीला गेले असताना, सोमनाथ प्रल्हाद नारडकर (रा.लोणी, ता.माढा) हा त्याच्या ताब्यातील बोलोरो पिकअप क्र.एमएच १३ सीजे ०९७७ हा मागे घेत होता. त्याने निष्काळजीपणे सदरचा पिकअप मागे घेऊन माझ्या वडिलांच्या अंगावर घातला. त्यात माझे वडील गंभीर जखमी होऊन मरण पावले आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## वासरांना निर्दयपणे वागणूक देणाऱ्याविरूध्द गुन्हा दाखल

करमाळा(सं.प्र.) : पिकअपमध्ये निर्दयपणे दाटीवाटीने कोंबून अन्नपाण्याची व्यवस्था न करता वाहतूक करणाऱ्या एका विरूध्द पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल हनुमंत लक्ष्मण भराटे यांनी फिर्याद दिली आहे.

त्यात त्यांनी म्हटले आहे, की आम्हाला माहिती मिळाल्यावर १३ जुलैला पावणेचारच्या सुमारास बायपास रोडवर महिंद्रा पिकअप उभा असलेला दिसला. त्यावेळी तेथे जाऊन पाहणी केली असता, रोहन बाबासाहेब खांडेकर (वय-२२, रा.पापणस, ता.माढा) हा महिंद्रा पिकअपमध्ये ७ खिल्लार जातीची खोंडे दाटीवाटीने कोंडून अन्नपाण्याची कोणतीही व्यवस्था न करता घेऊन जात असताना आढळून आला आहे. पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

**सा.संदेश वार्षिक वर्गणी १०० रु.**

## वंजारवाडी येथे महिलेचा विनयभंग

करमाळा(सं.प्र.) : आमच्या शेतात यायचे नाही, असे म्हणून महिलेचा विनयभंग करणाऱ्या विरूध्द पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी ४५ वर्षाच्या महिलेने फिर्याद दिली आहे. त्यात तिने म्हटले आहे, की भगवान विठ्ठल राख रा.कुरणवाडी (वंजारवाडी) याने ११ जुलैला सायंकाळी साडेपाच वाजता मी माझ्या घरासमोर असताना तेथे येऊन मला बिभित्स शिवीगाळ करून माझा विनयभंग केला आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

## पांडे रस्त्यावर अपघात हिवरे येथील प्रौढाचे निधन

करमाळा(सं.प्र.) : करमाळा-पांडे रस्त्यावर मोटारसायकल व टेंम्पोच्या झालेल्या अपघातात एकजण ठार तर दुसरा गंभीर जखमी झाला आहे. हा अपघात १८ जुलै रोजी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास पांडे गावापासून दोन किलोमीटर अंतरावर झाला असून या अपघातात नागनाथ तुकाराम शिंदे (वय-३२, रा.हिवरे) हे जागीच ठार झाले आहेत तर बाळासाहेब शिवदास चव्हाण (वय-३३, रा.हिवरे) हे गंभीर जखमी झाले आहेत. चव्हाण यांना पुढील उपचारासाठी सोलापूर येथे पाठविले आहे. या प्रकरणी पुढील तपास पोलीस करत आहेत.

## भर उन्हात गायी बांधणाऱ्या विरूध्द गुन्हा दाखल

करमाळा (सं.प्र.) : भर उन्हात दोन जर्सी गायींना बांधून अन्नपाणी व निवाऱ्याची व्यवस्था न केल्याप्रकरणी एका विरूध्द गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार १२ जुलैला दुपारी पावणेबारा वाजता मौलालीमाळावर घडला आहे. या प्रकरणी पोलीस हवालदार ज्ञानेश्वर प्रभुलिंग घोंगडे यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की १२ जुलैला पावणेबारा वाजता इजाज उर्फ बिल्डर हनीफ कुरेशी (रा.कसाबगल्ली,करमाळा) याने भर उन्हात जर्सी गायींना निर्दयपणे बांधून अन्नपाण्याची कोणतीही व्यवस्था केली नाही.

## करमाळा व इंदापूर तालुका दरम्यान जलवाहतुकीस तात्पुरती मान्यता

करमाळा(सं.प्र.) : कुगाव ते कळाशी (ता.इंदापूर) दरम्यान जलवाहतूक करणारी बोट बुडाल्यामुळे धरणावरील जलवाहतूक बंद करण्यात आली होती. परंतु उजनी धरण काठालगत असणारी करमाळा व इंदापूर तालुक्यातील गावांची यामुळे मोठी अडचण होत होती. या दोन्ही तालुक्याला जोडण्यासाठी नव्याने महायुती सरकारने पुल मंजूर केला असून, त्याचे कामे सुरू होण्यास अवधी आहे. दरम्यान या दोन तालुक्यातील दळणवळण व्यवस्थित व्हावे; यासाठी आमदार संजयमामा शिंदे यांच्या मध्यस्थीने उजनी धरणावरील जलवाहतूक तात्पुरत्या स्वरूपात सुरू करण्यास जिल्हाधिकारी यांनी मान्यता दिली आहे. लवकरच यावरती कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी विशेष बैठकीचे आयोजन केले जाणार असल्याची माहिती कुगाव दूध संस्थेचे चेअरमन सचिन गावडे यांनी दिली.


याबाबत माहिती देताना ते म्हणाले, की करमाळा व इंदापूर तालुका उजनीकाठावरील नागरीकांनी आमदार संजयमामा शिंदे यांची भेट घेऊन तेथील नागरीकांच्या व्यथा बोलून दाखवल्या. त्यावेळेस तत्परतेने आ.शिंदे यांनी जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी, तहसीलदार, करमाळा व इंदापूर तालुक्याचे पोलीस निरीक्षक, उजनी धरण व्यवस्थापन भीमानगरचे मोरे, लाभक्षेत्र विकास प्राधिकरणचे साळे यांना तात्काळ फोन करून याविषयी तोडगा काढण्याचे सुचविले. त्यास अनुसरून विद्यार्थी तसेच रूग्ण अशी अत्यावश्यक बाब लक्षात घेऊन तात्पुरत्या स्वरूपात लाईफ जॅकेटचा वापर करून जलवाहतूक करण्यास मान्यता दिली. त्यामुळे दोन्ही तालुक्यातील शेतकऱ्यांचा तात्पुरता प्रश्न सुटला आहे. याविषयी कायमस्वरूपी मार्ग काढला जाणार असल्यामुळे दोन्ही तालुक्यातील उजनी धरणकाठ लगतचे नागरीक समाधानी असल्याची भावना त्यांनी बोलून दाखवली.

## आषाढी एकादशीनिमित्त दत्तकला इंटरनॅशनल स्कुल तर्फे आनंदीवारी



करमाळा(सं.प्र.) : दत्तकला इंटरनॅशनल स्कुल एस.एस.सी आणि सी.बी.एस.इ विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आनंदवारी सोहळा अतिशय उत्साहात आणि आनंदी वातावरणात पार पडला. यानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये संतांच्या वेशभुषा, वारकरी फुगडी, नृत्यू, अभंग, गायन, भारूड, लेझीम असे कार्यक्रम सादर करनू विद्यार्थ्यांनी आपले कलागुण सादर केले. याप्रसंगी बोलताना संस्थेच्या सचिव माया झोळ यांनी विद्यार्थ्यांना वारीचे महत्व सांगितले. वारीमध्ये मिळणारी संघभावना, बंधूता, समता, प्रेम, भक्तीभाव या मुल्यांचे महत्व सांगत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच संस्थेचे अध्यक्ष प्रा.रामदास झोळ यांनी मुलांच्या कलागुणांचे कौतूक करत त्यांना प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष राणादादा सुर्यवंशी, मधुकरकाका झोळ, प्रशासकीय अधिकारी प्रा.डॉ.विशाल बाबर, डायरेक्टर ताटे मॅडम, ज्यु.कॉलेज प्राचार्य यादव मॅडम यांचेसह सर्व विभागाचे शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते.

इंदापूर येथील सुप्रसिध्द
**हृदयविकार तज्ञ**


**डॉ.रोहन हेगडे** (MD Medicine, DrNB Cardiology)
हे दर मंगळवारी दुपारी ४ ते ६ या वेळेत
शेलार हॉस्पिटल, करमाळा येथे हृदयविकारच्या रूग्णांची तपासणी व 2D ECHO साठी उपलब्ध असतील !
2D ECHO सुविधा आता करमाळ्यात उपलब्ध
पत्ता : सागर थिएटर रोड, शिवाजीनगर, करमाळा., जि.सोलापूर
हॉस्पिटलसाठी नर्सिंग स्टाफ व वॉचमन पाहिजे
संपर्क : मो.नं.9922957895, 9922957915

## पाहिजेत

महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत स्थापित सावित्रीबाई लोकसंचलित साधन केंद्र, अकलुज अंतर्गत दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी फुले उपजिविका अभियान (DAY NULM) या अभियानांतर्गत महिला बचत गटांचे कामकाज पाहणेसाठी करमाळा शहरामध्ये '**सह्योगीनी**' या पदाची आवश्यक आहे.

| क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| १ | सह्योगिनी | १ | १०/१२ वी पास व महिला बचत गट, सामाजिक संस्थेच्या कामाचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य. |

सदर कामाची तयारी असल्यास जाहिरात प्रसिध्द दिनांक पासून सात दिवसाच्या आत खालील पत्त्यावर अर्ज जमा करावेत.

**पत्ता : करमाळा नगरपरिषद, दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान, महिला आर्थिक विकास महामंडळ अभियान कक्ष, करमाळा., जि.सोलापूर.**
**मो.9284944517, 9960236571**

सही/-
अध्यक्ष-सावित्रीबाई फुले लोकसंचलित साधन केंद्र

आशिर्वाद



स्व.डॉ.रतनलाल माणिकचंद शहा-जवळेकर

# शहा हॉस्पिटल

मेनरोड, करमाळा.,जि.सोलापूर (जवळेकर)

## नवीन रुपात..,
## नवीन जागेत..,

स्थलांतरीत झालेल्या **'शहा हॉस्पिटल'** च्या यशस्वी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा !



**डॉ.राजेश आर. शहा**
एम.बी.बी.एस., डी.सी.एच. (बालरोग तज्ञ)



**डॉ.संदेश आर. शहा**
एम.एस.(जनरल सर्जन)

### उपलब्ध सुविधा

- डी.आर.डिजीटल एक्स-रे
- अल्ट्रा सोनोग्राफी
- कॉम्प्युटराईज्ड लॅबोरेटरी
- सरकारमान्य कुटूंब नियोजन व गर्भपात केंद्र
- सुसज्ज ऑपरेशन थिएटर
- अतिदक्षता विभाग
- हायस्पीड स्पायरल सिटीस्कॅन इन कॅम्पस्
- कलर डॉपलर
- ई.सी.जी.
- सर्जीकल होम
- फिजिओथेरपी
- सी-आर्म
- गॅस्ट्रोस्कोपी



I.C.U.



Multislice CT Scan



Gastroscope



DR Digital X-Ray



C-Arm



Pathology




E.C.G.



Pulse Oxymeter



Colour Doppler Sonography



Ventilator




शुभेच्छुक

सुंदर तेचि माझे घर



सर्वांच्या मनात, रंग-सुरात सजलेले वास्तुशिल्प

**के.बी.कन्स्ट्रक्शन**

प्रोप्रा : प्रितम किशोर भगत करमाळा